# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड   जा. क्र. 66/2024   दिनांक : 19.02.2024

## 1)जबरी चोरी :–

**शिवाजीनगर** :–दिनांक 17.02.2024 रोजी चे रात्री 10.00 वा. चे सुमारास, **नागार्जुना हॉटेलच्या बाजुला नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्याचा मित्र अभिशेख असे बियर पिण्यासाठी नागार्जुना हॉटलचे बाजुस असलेले रोडचे अंधारात थांबले असता यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून खंजरचा धाक दाखवुन फिर्यादीकडील मोबाईल जबरीने काढुन घेतले व त्यांना जबरदस्तीने त्यांचे घरी घेवुन गेले व तेथे परत त्यांना मारहाण करून अभिषेक यांच्या मोबाईलचा जबरदस्तीने पासवर्ड घेवुन त्यांचे गुगल पे वरून अकराशे रूपये काढुन घेतले. वगैरे **फिर्यादी स्वप्नील वसंत मगरे, वय 24 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. आंबेडकरनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 67/2024 कलम 394, 365, 342, 34 भादवी सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री माने, मो. नं. 9403546846** हे करीत आहेत.

## 2)खंडणी :–

**मुखेड** :–दिनांक 17.02.2024 रोजी चे 21.45 वा. चे सुमारास, **मुखेड ते नरसी जाणारे रोडवर टॉनिक बियर बार मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी हा ग्रामपंचायत अंतर्गत करत असलेले जलवि जीवन मिशनचे कामाची तक्रार व संबधीत कामाच्या बातम्या प्रकाशित न करण्यासाठी दोन लाख रूपयाची खंडणी मागीतली. तडजोडीअंती 1,30,000/–रूपये देण्याचे पंचासमक्ष ठरले. आरोपीतांनी पहिला हाफ्ता म्हणुन 15,000/–रू खंडणीची रक्कम स्वीकारली. वगैरे **फिर्यादी डॉ. प्रविणकुमार रामराव गव्हाणे, वय 48 वर्षे, आदित्य हॉसपीटल बाऱ्हाळी रा. माकणी ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 49/2024 कलम 384, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मंचक फड, मो.क्रं. 9923057399** हे करीत आहेत.

## 3)अपघात :–

**देगलुर** :– दिनांक 18.02.2024 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **सिध्देश्वर मंगल कार्यालय समोर रोडवर देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे आमोल यादव वाघमारे, वय 28 वर्षे, व्यवसाय मिस्त्रीकाम रा. बल्लुर ता. देगलुर जि. नांदेड** हा मोटार सायकलवर जात असतांना यातील ॲपे लोडींग ॲटो क्रमांक एपी–25/एक्स–2680 च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन यातील मयताचे मोटार सायकलला जोराची धडक देवुन त्याचे मरणास कारणीभुत झाला. त्यास उपचारकामी दवाखान्यात न नेता तेथुन पळुन गेला. वगैरे **फिर्यादी अशोक यादव वाघमारे, वय 32 वर्षे, व्यवसाय मिस्त्रीकाम रा. बल्लुर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं. 71/2024 कलम 279, 304(अ) भादवी सह कलम 134, 196 मोवाका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री घोंगडे, मो.क्र. 8275266564** हे करीत आहेत.

## 4)प्रोव्हिबीशन :–

**किनवट** :– दिनांक 18.02.2024 रोजी 17.00 वा. चे सुमारास, **आरोपीचे राहाते घरी मौ. कोठारी ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी गावठी दारू किंमती 2200/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1913 अप्पाराव बाबाराव राठोड, ने. पोस्टे किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 33/2024 कलम 65 (ई),(ब), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2441 आडे, मो.नं. 9923592441** हे करीत आहेत.

## 5)गळफास घेवुन आत्महत्या :–

**नांदेड ग्रामीण** :–दिनांक 18.02.2024 रोजी चे 14.20 वा. चे सुमारास, **मयताचे घरी मौ. वाघाळा ता. जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे साक्षी सतीश गिरडे, वय 17 वर्षे, रा. वाघाळा ता. जि. नांदेड**, हिने वडीलांचे गरीबीला कंटाळुन ओढणीने घराचे छताचे कडीस गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार सतिश संभाजी गिरडे, वय 33 वर्षे, व्यवसाय हमाली रा. वाघाळा ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** आ. मृ. **25**/2024 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जामोदकर, मो.नं. 9923895077** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 67/2023 दिनांक : 19.02.2024**

पोलीस अधिक्षक कार्यालयात **"छत्रपती शिवाजी महाराज"** यांची जयंती साजरी

19 फेब्रुवारी, 2024 सोमवार रोजी **"छत्रपती शिवाजी महाराज"** या महापुरूषांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली. **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, यांचे हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी **श्री नामदेव रिठठे**, पोनि पोलीस कल्याण नांदेड, **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी, यांचेसह पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार मोठया संख्येने उपस्थित राहुन **"छत्रपती शिवाजी महाराज"** या महापुषास अभिवादन केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन, **सपोउपनि/सुर्यभान कागणे, पोहेकॉ/संजय सांगवीकर, पोकॉ/मारोती कांबळे, विनांदे भंडारे** यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड